स्थायी समिती

दाखल विषय – दि. २२/६/२०२१

विषय क्रमांक :– ४०३ त्वर्य

सन २०२१–२२ या आर्थिक वर्षाकरीता पथ विभागामार्फत होणाऱ्या ई.लिलावासाठी ऑक्शन आणि डिलिव्हरी कमिटीमध्ये खालील दोन मा.स्थायी समिती सदस्यांची नावे मुख्य अभियंता(पथ) विभागाकडे कळविणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२३३ दि. १८/६/२०२१ चे पत्र.

**१) मा.महेश वाबळे**

**२) मा.राहुल भंडारे**

विषय क्रमांक :– ४०४ त्वर्य

औंध क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या भागामध्ये विविध ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.संतोष वॉटर टँकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९९,१८९/– पेक्षा १२.५००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४३,७४,२९०=३८ पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/२३४ दि. १८/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४०५ त्वर्य

शिवाजीनगर – घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत पडीक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे (सन २०२१–२०२२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,९७,७९,२३०/– पेक्षा ९% जास्त) (सुधारित दर) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,२४,५९,३६०=७० पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतन वाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस, तसेच निविदा उघडलेच्या दिनांकापासून काम करुन घेणेस व त्या दिवसापासून बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. २/२३५ दि.१८/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४०६ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने, रुग्णालये व प्रसुतिगृहांसाठी श्वानदंश लस खरेदी करणे. (टेंडर क्रमांक ३ सन २०२१–२०२२) कामी निविदा मागविल्या असता एकुण दोन निविदाधारकांनी त्यांची निविदा सादर केली असून त्यांनी दिलेल्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता लक्ष्मी मेडिकल्स यांनी सर्वात कमी दर दिलेला असल्याने पुणे महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने, रुग्णालये व प्रसुतिगृहांसाठी श्वानदंश लसीची खरेदी खात्याच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार या निविदेतील पात्र निविदाधारक लक्ष्मी मेडिकल्स यांचेकडून प्रति व्हायल्स रक्कम रुपये २८१/– (अक्षरी रुपये दोनशे एक्याऐंशी फक्त) जीएसटी करासहित प्रमाणे Injection Anti Rebbies Vaccine ०.५ ml / १ml रक्कम रुपये ७२,००,०००/– (अक्षरी रुपये बाहत्तर लाख फक्त) पर्यंत खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करण्यास आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यात मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२३७ दि.१८/६/२०२१ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२१–२०२२
RE17F195
श्वानदंशावरील लस व ईमिनोग्लोबिन खरेदी करणे.
मान्य तरतूद रक्कम रुपये ७२,००,०००/– पैकी ७२,००,०००/–

विषय क्रमांक :– ४०७ त्वर्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतुदीच्या अनुषंगाने वैकुंठ स्मशानभुमी मधील पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यान्वीत असणाऱ्या विद्युत दाहिनी, गॅस दाहिनी, वुड पायर यंत्रणा या सर्व यंत्रणेची NEERI (National Environmental Engineering Research Institute), पत्ता:– नेहरु मार्ग, नागपूर ४४००२० या संस्थेमार्फत त्रयस्थ पध्दतीने तपासणी करुन त्यानुसार त्यांचेकडुन सुधारणा अहवाल घेण्यास व त्यापोटी त्यांना र.रु. १६,८७,४००/– पर्यंत बिल अदा करणेस व सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/२३८ दि.१८/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४०८ त्वर्य

मौजे फुरसुंगी उपसागृहे (विहीर क्र. १,२,३,५) व ५ एम.एल.डी. जलशुध्दीकरण केंद्र (तुकाई टेकडी) दोन वर्ष कालावधी करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदर्श इलेक्ट्रिकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८३,५४,४०४=२४ पेक्षा ७% जास्त (तडजोडीने)) असल्याने त्यांचेकडून र.रु.८९,३९,२१२=५३ अधिक महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायदानुसार वेतनामध्ये होणाऱ्या बदलाच्या फरकाच्या रकमेसह त्यांचेकडून काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/२३९ दि. २१/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४०९ त्वर्य

औंध बाणेर व शिवाजीनगर घोले रोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत रस्त्याचे रिसर्फेसिंग, देखभाल दुरुस्ती व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जय शिवशंकर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३५,७१,२६९=१४ पेक्षा ३५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २३,२१,३२४=९४ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,२८,५५२=३० पर्यंत मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२४० दि.२१/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४१० त्वर्य

पुणे मनपाच्या येरवडा बॅच मिक्स प्लान्टमार्फत कार्यकारी अभियंता (पथ) झोन क्र. १,२,३ व ४ यांच्या अखत्यारितील विविध मुख्य रस्त्यांवर आवश्यकतेनुसार रिसर्फेसिंगची कामे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जय शिवशंकर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८९,२७,३८६/– पेक्षा २७.८१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६४,४४,६७९=९५ पर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी. र.रु. १०,७१,२९६=३२ पर्यंत काम करुन घेणेस व करार करणेस व सदरचे काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने प्राईज बिड दिनांकापासून काम करुन घेणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२४१ दि.२१/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४११ त्वर्य

प्रभाग क्र. २६ ड मध्ये हांडेवाडी रोड ते स.नं. ७२ लगतचा डी.पी.रस्ता व नाल्यावरील कल्व्हर्ट बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदगुरु कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,३३,३२४/– पेक्षा ३.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८४,८०,८७४=३७ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,५९,९९८=८८ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ४,९४६=९० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १६,२२५/– पर्यंत अधिक कंन्सलटंट चार्जेस र.रुपये ८५,०००/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२४२ दि.२१/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४१२ त्वर्य

आर्किटेक मे.स्टुडिओ इनफील यांची पुणे महानगरपालिकेच्या अर्बन डिझाईनरच्या पॅनेलवर नियुक्त करण्यास व रस्ते डिझाईन करण्याकरिता ३० मी. रुंदी खालील रस्त्याकरीता र.रु. ९ लक्ष/कि.मी. व ३० मी.रुंदीवरील रस्त्याकरीता र.रु. १०/ लक्ष प्रति कि.मी. व रस्त्याच्या चौकासाठी र.रु. ६० प्रति चौ.मी. खात्याने मान्य केलेल्या स्कोप ऑफ वर्कनुसार काम करण्यास तसेच अधिक शासनाच्या प्रचलित नियमानुसार सेवाकर अदा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२४४ दि.२१/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४१३ त्वर्य

मा.मुख्य सभेमध्ये दि. १८/६/२०२१ रोजी कोंढवा येथे सिव्हिक कल्चरल व कम्युनिटी सेंटरचे अर्धवट काम पूर्ण करणे कामाबाबत विस्तृत चर्चा झालेली आहे. सदर चर्चेनुसार मा.स्थायी समिती ठराव क्र. १४०९ दि. ९/३/२०२१ चा फेर विचार होऊन सदर कामाचे सर्वात कमी दराचे ठेकेदार मे.सलिम कन्स्ट्रक्शन यांचेकडून त्यांचे ॲटपार दरानुसार र.रु. ८८,५८,७६५/– (अक्षरी र.रु. अठ्ठयाऐंशी लक्ष अठ्ठावन हजार सातशे पासष्ट रुपये फक्त) पर्यंत कामे करुन घेणेस अधिक जीएसटी र.रु. १०,६३,०५१=८० पर्यंत रॉयल्टी र.रु. १४,१३४/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १५,४३५/– पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष

भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करण्यास व त्यांचेशी करारनामा करण्यास तसेच नियमानुसार कल्चरल सेंटरचे जे वापर अनुज्ञेय आहेत केवळ त्याच वापरासाठी कल्चरल सेंटरचा उपायोग करण्यास तसेच मा.मुख्य सभेच्या मान्यतेनंतरच कल्चरल सेंटरच्या वापरास परवानगी देण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२४५ दि.२२/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४१४ त्वर्य

शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय मैदान शिवाजीनगर व बाणेर व पुणे मनपाचे इतर कोव्हिड रूग्णालय येथे लिक्विड ऑक्सिजन गॅस रिफिलिंग करणे. ( टेंडर क्रमांक ६ सन २०२१-२२) कामी निविदा मागविल्या असता एकुण दोन निविदाधारकांनी निविदा सादर केली असून त्यांचेकडून प्राप्त झालेल्या दराचे अवलोकन केले असता टायओ निपॉन सॅनसो इंडिया प्रा.लि.यांनी सर्वात कमी दर दिला असल्याने सदरचे काम टायओ निपॉन सॅनसो इंडिया प्रा.लि.या निविदाधारकाकडून प्रति क्युबिक मीटर जीएसटी करासह रक्कम रूपये १७.३० पैसे प्रमाणे तेथील मागणीनुसार व आवश्यकतेनुसार रक्कम रूपये ३,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीन कोटी फक्त) पर्यंत खरेदी करणेस तसेच पुणे मनपाच्या कोव्हिड सेंटर्सच्या ऑक्सिजनच्या मागणीनुसार तातडीने विनाखंडित ऑक्सिजनचा पुरवठा करणेकामी केवळ एका पुरवठाधारकावर अवलंबून न राहता आयनॉक्स एअर प्रॉडक्टस प्रा.लि.यांना देखील खात्याच्या आवश्यकतेप्रमाणे प्रति क्युबिक मीटर जीएसटी करासह रक्कम रूपये १७.३० पैसे प्रमाणे वर्कऑर्डर देणेस व त्यांचेकडून ऑक्सिजनचा पुरवठा करून घेणेस व उपरोक्त दोन्ही निविदाधारकांकडून अनामत रक्कम भरून न घेणेस, करारनामा करून न घेणेस व खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२४७ दि.२२/६/२०२१ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२१- २२
RE17F258
आरोग्य विभाग कोव्हिड १९ अंतर्गत विविध दवाखाने व रूग्णालयांसाठी
वैदयकीय उपचाराची साधने खरेदी करणे.( रूग्णालयाकरीता आयसीयु सुरू करणेकरीता
शस्त्रे,उपकरणे ऑक्सिजन सिलेंडर,एन-९५ मास्क,पीपीई किट,व्हिटिएम किट खरेदी )

विषय क्रमांक :– ४१५ त्वर्य

केशवनगर, साडेसतरानळी व मांजरी येथे टँकरने पाणीपुरवठा करणे (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.संतोष वॉटर टँकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९४,०००/– पेक्षा ०.०००% कमी)(अॅटपार) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४९,९४,०००/– पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/२४८ दि. २२/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४१६ त्वर्य

प्रभाग क्र. १२ क मयूर कॉलनी येथे क्रीडासंकुल निर्माण करणे २ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दीपार्थ इन्फ्रास्ट्रक्चर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,५८,१४१=५० पेक्षा ०.५००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४९,३३,३५०=७९ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,९४,९७६=९८ पर्यंत अधिक मेटरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३२,७०९/– अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ८९,०४४=२० पर्यंत अधिक अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२६० दि.२२/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४१७ त्वर्य

बाणेर स.नं. ३३ कोविड सेंटरमध्ये ५०० के.व्ही.ए. जनरेटर पुरविणे व बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.व्ही.एस.इंजिनिअरिंग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. २८,९१,२८९/– पेक्षा ३.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,७५,९२६=५७ अधिक जी.एस.टी. १८% र.रुपये ४,९९,६६६=७८ असे एकूण र.रु. ३२,७५,५९३=३५ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/२५१ दि.२२/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४१८ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांकरीता ६० डाटा एन्ट्री ऑपरेटर्स यांची सेवा दि.०२/०६/२०२१ पासून पुढील टेंडर प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ मिळणे साठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे क्र. मआ/मावतं/२५१ दि. २२/६/२०२१ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांकरीता ६० डाटा एन्ट्री ऑपरेटर्स यांची सेवा दि.०२/०६/२०२१ पासून पुढील टेंडर प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ मिळणेस.

२) मे.जय शंकर असोसिएटस यांना मुदतवाढ कार्यादेश देणेस व करारनामा करणेस.

३) मे.जय शंकर असोसिएटस यांना कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० कंत्राटी कामगारांचे किमान वेतन दर ( माहे ०१,जानेवारी-२०२१ ते माहे ३०,जून-२०२१ साठी दर र.रु.८५७.७५ प्रती ऑपरेटर प्रती दिन + कर अदा करणेस.

४) मे.जय शंकर असोसिएटस यांना किमान वेतन कायदा नियम १९४८ नुसार सुधारित दराने बिल अदा करणेस.

५) सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस

RE11N126

सन 2021-22

माहिती व तंत्रज्ञान विषयक कामकाजाकरिता तांत्रिक मनुष्यबळ पुरविणे

विषय क्रमांक :– ४१९ त्वर्य

वडगाव जलशुध्दी केंद्र फेज १ व २ तीन वर्षाकरिता चालविणे, दैनंदिन देखभाल दुरुस्ती व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.विश्वराज इन्व्हायरमेंट प्रा.लि., ४ था मजला, मधु महादेव टॉवर, धरमपेठ, नागपुर यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १७,७२,८८,९५८=३० पेक्षा ७.७०५% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु. १६,३६,२८,८४४=०६३ अधिक प्रचलित दराने येणारा जी.एस.टी. (१२%) र.रु. १,१०,९४,०५०=२० असे एकूण र.रु. १७,४७,२२,८९४=२६ (अक्षरी रक्कम रुपये सतरा कोटी सत्तेचाळीस लाख बावीस हजार आठशे चौऱ्याएन्नव रुपये सव्वीस पैसे फक्त) + (अधिक किमान वेतन कायदयानुसार विशेष भत्ता, रजा वेतन, भविष्य निर्वाह निधी, बोनस इ. वेतनामध्ये होणाऱ्या बदलानुसार होणारा फरकानुसार) तसेच पुर्वीची निविदा रक्कम संपुष्टात आल्याने सदर निविदा ही ठेकेदाराचे ब पाकीट उघडलेच्या दिनांकापासून म्हणजेच दि.२१/५/२०२१ पासून कामाचे बिल अदा करणेस व बिलापोटी आवश्यक त्या वजावटी करणेस तसेच त्यानुसार त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/पापु/२५३ दि. २२/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४२० त्वर्य

हडपसर–मुंढवा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडण कामासाठी कंत्राटी सेवक नेमणे या कामाचे ठेकेदार मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३)(क) अन्वये नेमणूक करणेसाठी खालील बाबी मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/परि.क्र.४/२५६ दि. २२/६/२०२१ चे पत्र.

१) मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून दिनांक १ एप्रिल २०२१ ते दिनांक ३० जून २०२१ पर्यंत काम विना करारनामा करुन घेण्यात येणार आहे.

२) मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून दिनांक १ एप्रिल २०२१ ते दिनांक ३० जून २०२१ पर्यंत करण्यात येणाऱ्या कामाचे बिल र.रु. २,५२,५२,६५६/– (अक्षरी दोन कोटी बावन्न लक्ष बावन्न हजार सहाशे छपन्न रुपये फक्त) इतकी अनामत रक्कम वजावट न करता अदा करण्यात येणार आहे.

३) मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३)क अन्वये कामकाज करुन घेण्यात येणार आहे.

४) तसेच हडपसर–मुंढवा क्षेत्रिय कार्यालयातील निविदा प्रक्रिया पुर्ण होवून कार्यादेश होईपर्यंत मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून त्यांचे प्राप्त झालेल्या दरानुसार काम करण्यात येणार आहे.

विषय क्रमांक :– ४२१ त्वर्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३)(क) अन्वये अथर्व नेचर हेल्थ केअर प्रा.लि. या मुळ उत्पादक कंपनीकडून महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.(एम.एन.जी.एल.)कंपनी यांनी दिलेल्या पत्रानुसार १००० स्वच्छता सेवक व आरोग्य सेवक कंत्राटी कामगार यांना र.रू.३३ लक्ष रकमेपर्यंत अथर्व सुवर्णभस्मादी वटी औषध खरेदी करणेस व महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.(एम.एन.जी.एल.) कंपनी यांचेकडून सीएसआर अंतर्गत प्राप्त झालेला निधी मधुन अथर्व नेचर हेल्थ केअर प्रा.लि.यांचे बिल अदा करणेस व सदर बाब मा.मुख्य सभेच्या मान्यतेस सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/२५७ दि. २२/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४२२ त्वर्य

पुणे महानगरपालिकेमार्फत घोलेरोड शिवाजीनगर पुणे याठिकाणी अद्ययावत सिटी लायब्ररी उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार यशराज ग्लोबल इन्फ्राकॉन एलएलपी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७,९७,५०,११२=५५ पेक्षा १५.७५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६,७१,८९,४६९=८२ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ९५,७०,०१३=५१ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ८१,५५३=१८ अधिक मेटरियल टेस्टिंग र.रुपये ५,९६,४००/– अधिक निविदा अटी शर्तीनुसार सर्वसाधारण भाववाढ अधिक सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२५८ दि.२२/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४२३ त्वर्य

प्रभाग क्र. ४१ कोंढवा बु. स.नं. ३१ येथील स्मशानभूमी मध्ये विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ११ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आनंद बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६२,१४,३६४=०२ पेक्षा १६.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५२,१९,९४१=४९ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ७,४५,७२३=६८ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. २,८८३=२० अधिक मेटरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३६,६५०/– पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२५९ दि.२२/६/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ४२४ त्वर्य

आमचे प्र.क्र.१९ मध्ये लोहियानगर काशेवाडी येथे कै.जनरल अरूणकुमार वैद्य स्टेडियम येथे असलेले लहुजी वस्ताद फिटनेस क्लब (व्यायाम शाळा) याबाबत मी मा.मुख्यसभा माहे मे २०२१ चे कार्यपत्रिकेवरील प्रश्नोत्तरामध्ये प्रश्न उपस्थित केला होता. सदर प्रश्नामध्ये मी सदरील फिटनेस क्लब कोणत्या खाजगी संस्थेस पुणे मनपा समवेत करारनामा करून चालविण्यास देण्यात आलेले आहे का? याबाबतचे लेखी उत्तर संबंधित विभागाकडून आले असता, त्यामध्ये सदरील व्यायाम शाळा कोणत्याही खासगी संस्थेस चालविण्यात दिलेले नाही,असे कळविण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात सध्य:स्थितीमध्ये सदरील व्यायाम शाळेचा ताबा विनाकरारनामा राजकीय व्यक्तीच्या वरदहस्ताने अन्य कोणत्या व्यक्तीकडे असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे सदरील व्यायाम शाळा ही विनाकरारनामा अनधिकृतपणे ताब्यात घेवून पुणे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदरील भाग हा झोपडपट्टीमध्ये असून त्या ठिकाणी कोणताही अनर्थ घडला तर त्यास पुर्णपणे पुणे मनपा प्रशासन जबाबदार असणार आहे.

तरी प्र.क्र.१९ मध्ये लोहियानगर काशेवाडी येथे कै.जनरल अरूणकुमार वैद्य स्टेडियम येथे असलेले लहुजी वस्ताद फिटनेस क्लब (व्यायाम शाळा) पुणे मनपाने सील करून स्वत:च्या ताब्यात घेण्यास मान्यता मिळणेबाबत मा.सौ.अर्चना तुषार पाटील यांचे दि.१७/०५/२०२१ चे पत्रावर झालेला मा.क्रिडा समिती ठराव क्र. १० दि. ९/६/२०२१ विचारासाठी.

विषय क्रमांक :– ४२५ त्वर्य

मा.सौ.सुनिता गलांडे व मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि.२२/६/२०२१ चे पत्र

पुणे महानगरपालिकेच्या विधी सल्लागार पॅनेलवर नामांकित वकीलांची नेमणूक करण्यात येते. ॲड.श्री.गोपाल भास्कर माले हे गेल्या १५ वर्षापासून वकील म्हणून प्रॅक्टीस करीत असून त्यांना कामाचा चांगला अनुभव आहे. तरी त्यांची पुणे महानगरपालिकेच्या विधी सल्लागार पॅनेलवर विधी सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ४२६ त्वर्य

मा.राजाभाऊ लायगुडे यांचे दि.२२/६/२०२१ चे पत्र

गाव मौजे आंबेगाव बु. तालुका हवेली जिल्हा पुणे येथील स.नं. २५/६/२अ, स.नं. २५/६/३, स.नं. २५/६/४, स.नं. २५/६/५, स.नं. २५/६/६, स.नं. २५/६/८, स.नं. २५/९/६, स.नं. २५/९/७, स.नं. २५/९/१०, स.नं. २५/९/१२, स.नं. २५/९/१७ येथील कनेक्टीविटी मिळणेसाठी अस्तित्वातील ९ मी. रस्ता बंद करुन २१० प्रमाणे पुर्व पश्चिम रस्ता प्रस्ताव करणेस मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ४२७ त्वर्य

मा.हरिदास चरवड यांचे दि.२२/६/२०२१ चे पत्र

गेल्या चार वर्षात पुणे महानगरपालिकेने स्वप्नवत वाटणारे प्रकल्प पूर्ण केले आहेत. उदा. स्मार्टसिटी, जायका,मेट्रो प्रकल्प,भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय, 24x7 पाणीयोजना इत्यादी.पुणे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प सहा हजार कोटीचा आहे या माध्यमातून पुणे उदा.रस्ते,पूल,क्रीडासंकुल,व्यायामशाळा,जलतरण तलाव, अभ्यासिका,वारकरी भवन,महिला बचत गट भवन, सांस्कृतिक भवन, नाट्यगृह इत्यादी अनेक गोष्टी करत असताना प्राचीन संस्कृती व आधुनिक विज्ञान याचा अनोखा संगम साधून केलेली प्रगती जाणवते.

शहराचा विकास करत असताना मुलांची कल्पकता आणि विज्ञान जिज्ञासा कसे वाढीस लागेल यासाठी आपण प्रयत्न करत असतो याच अनुषंगाने भारतीय रेल्वे ही मोठ्या प्रमाणात स्वस्त प्रवासी वाहतूक व मालवाहतूक करणारी सरकारी आस्थापना आहे हे जरी माहीत असले तरी रेल्वेची फारशी माहिती आपल्याला नसते, भारतीय रेल्वेचे जाळे, स्टेशन्स,इंजिनची संख्या याबाबतीत जगात दुसरा क्रमांक आहे तसेच रेल्वे इंजिनची नावे त्याचे परिवलन,रूळ बदलणे,सिग्नल्स ची माहिती सर्वांचा नसते.

ही माहिती नागरिकांना विशेषत: मुलांना तसेच इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून माझे मित्र श्री.जितेंद्र चंपानेरकर हे या विषयातले तज्ञ आहेत व त्यांनी आपल्या कारखान्यात छोटी रेल्वे इंजिन्स,डबे(बोगी),मालगाडीचे वॅगन,रूळ,सिग्नल्स असे सर्व तयार केले आहेत व त्याचा एक मोठा प्रकल्प (प्रदर्शन कायमस्वरूपी) ते करू इच्छितात. अशा प्रकारचे प्रकल्प परदेशांमध्ये प्रामुख्याने जर्मनीमध्ये आहेत. यामध्ये एक शहर वसवलेले असते रेल्वे स्टेशन,इमारती,शाळा,मैदान,विमानतळ,मेट्रो,रस्ते व त्यावरील वाहतूक, नदी,हिरवळ, नंतर शहरा बाहेर जाणारी रेल्वे,डोंगर,बोगदा,नदीवरील मोठा पुल, शेती,गाव असा मोठा परिसर रेल्वेचे वर्कशॉप, रूळ बदलणारी रेल्वे गाडी मुलांना जवळून पाहता येते जे प्रत्यक्षात पाहता येत नाही. यात रंगीबेरंगी ध्वनी प्रकाश योजना केलेली असते त्यामुळे असे प्रदर्शन खूप नयनरम्य असते. आपल्याकडे कोथरूडला जोशी यांचे रेल्वे म्युझियम आहे पण ते सर्व विदेशी साहित्य आणून केलेले आहे व छोट्या जागेत आहे श्री.चंपानेरकर यांनी केलेली सर्व मॉडेल्स ही भारतीय रेल्वेची प्रतिकृती आहे.

अशाप्रकारचे प्रदर्शन माझ्या माहितीप्रमाणे भारतात कोठेचे नाही असे प्रकल्प पुण्यात झाल्यास पुण्याचे नाव देशात चमकणार आहे. भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब हे देशातील मुलांसाठी खेळणी उत्पादन या विषयात लक्ष घालत आहे तसेच त्यांनी रेल्वे विषयक खूप सुधारणा केलेल्या आपण पाहतो. तसेच जास्त अश्वशक्तीची इंजिने,उत्पादन वाढ या अत्तापर्यंत न झालेल्या गोष्टी त्यांनी झपाट्याने पूर्ण केल्या आहे.

अशा प्रकरचा प्रकल्प जर झाला तर तो पुण्याच्या वैभवात नक्कीच भर घालेल श्री.चंपानेरकर यांनी याआशी मे २०१८ मध्ये राजाराम पूल जवळ असे छोटे प्रदर्शन भरविले होते त्याची चित्रफित पाहता येईल. श्री.चंपानेरकर यांच्याबरोबर त्यांची टीम आहे. व यातील अनेक कामे बाहेरून म्हणजे त्या त्या कारागिराकडून घेण्यात येईल त्यामुळे त्यांना कामही मिळेल व काही जणांना रोजगार मिळेल आणि त्यांना स्वत:ला आवड असल्यामुळे ते हा प्रकल्प मोठ्या जिद्दीने पूर्ण करतील असा मला विश्वास आहे.

तरी सदरच्या प्रकल्पास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ४२८ त्वर्य

मा.सौ.सुनिता वाडेकर, उपमहापौर, पुणे यांचे दि. १७/६/२०२१ चे पत्र.

नगरसचिव कार्यालयाकडे सेवकवर्ग कमी प्रमाणात असल्याने बऱ्याच पदांच्या जागा रिक्त आहेत. सदर विभागाकडे पुणे महानगरपालिकेकडील शिक्षण विभाग (प्राथमिक) या विभागाकडील सेवक श्री. संजय जनार्दन सोनवणे हुद्दा – शिपाई हे नगरसचिव कार्यालयाकडे काम करण्यास इच्छुक असल्याने त्यांची सेवा पुस्तकासह बदली नगरसचिव कार्यालयाकडे करणेत यावी.

विषय क्रमांक :– ४२९ त्वर्य

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि. २२/६/२०२१ चे पत्र.

गेले दीड वर्षे कोरोना काळात पुणे शहरातील शहरी व गरीब नागरीकांचे छोटे मोठे व्यवसाय पूर्णत: ठप्प झाले आहेत. यामध्ये पुणे शहरातील अधिकृत फेरीवाला, हातगाडीधारक, पथारीधारक, स्टॉलधारक हे देखील गेल्या दीड वर्षाच्या कालावधीमध्ये स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी कुटुंबाची मोडकळीस आलेली आर्थिक घडी बसविण्याचा प्रयत्न करीत आहेत. दीड वर्षात यांचेही व्यवसाय मोठया प्रमाणावर ठप्प झाल आहेत. पुणे महानगरपालिकेतर्फे फेरीवाला धोरण नुसार या सर्व पथारीधारकांना सन २०२०–२०२१ च्या आर्थिक वर्षातील भाडे आकारणीची बिले पाठविण्यात आली आहेत.

कमीतकमी बिलेही ५० रू प्रति दिन भाडे X ३६५ दिवस = १८२५० + २२५० रू. इतका दंड आकारला आहे. हा एक प्रकारे पुणे शहरातील जवळजवळ ८०००० पथारी व्यावसायिकांना अन्यायकारक आहे. तरी मागील आर्थिक वर्षामध्ये कोरोना काळात पथारीचे व्यवसाय पूर्णत: बंद असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आजही कोरोनाच्या नियमावलीमध्ये हे व्यवसाय पूर्ण क्षमतेने चालू नाहीत त्यामुळे सर्व पथारीधारकांना सन २०२०–२०२१ या आर्थिक वर्षाच्या भाडे आकारणीत व्यवसाय भाडे व दंड पूर्णत: माफ करणेत यावा.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.